**ठळक बातम्या**

- संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी लोकसभेत आर्थिक पाहणी अहवाल सादर / २०२४-२५ वर्षासाठी स्थूल राष्ट्रीय उत्पादन वाढीचा दर साडे सहा ते सात टक्के राहण्याचा अंदाज

- सर्व राजकीय पक्षांनी पक्षीय धोरणं बाजूला ठेवून पुढची साडे चार वर्षे स्वतःला देशासाठी समर्पित करण्याचं प्रधानमंत्र्यांचं आवाहन

- केंद्र सरकारच्या कर्मचाऱ्यांसाठी ८ वा वेतन आयोग स्थापन करण्याचा, तसंच जुनी पेन्शन योजना पुन्हा लागू करण्याचा कोणताही प्रस्ताव नसल्याचं सरकारचं लोकसभेत पुनर्प्रतिपादन

**आणि**

- कावड यात्रा मार्गावरच्या, खाद्यगृहांच्या मालकांनी दुकानाच्या पाटीवर स्वतःचं नाव लिहिण्याच्या, उत्तर प्रदेश आणि उत्तराखंड सरकारच्या निर्देशांना सर्वोच्च न्यायालयाची स्थगिती

**<><><><><>**

२०२३-२४ च्या आर्थिक सर्वेक्षण अहवालात आर्थिक वर्ष २०२४-२५ वर्षासाठी स्थूल राष्ट्रीय उत्पादन वाढीचा दर साडे सहा ते सात टक्के राहण्याचा अंदाज व्यक्त केला आहे. अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी लोकसभेत केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामण यांनी आर्थिक पाहणी अहवाल सादर केला. जागतिक स्तरावर आर्थिक कामगिरीत अनिश्चितता असताना आर्थिक वर्ष २०२३-

२४ मध्ये देशांतर्गत वाढीला चालना देणाऱ्या घटकांमुळे आर्थिक वाढीला मदत मिळाली असल्याचं अहवालात म्हटलं आहे.

रिझर्व्ह बँकेनं आर्थिक वर्ष २०२५ साठी चलनफुगवट्याचा दर साडे चार टक्के आणि आर्थिक वर्ष २०२६ साठी चलनफुगवट्याचा दर ४ पूर्णांक १ दशांश टक्के राहण्याचा अंदाज व्यक्त केला आहे.

**<><><><><>**

२०२४ - २५ या आर्थिक वर्षासाठीचा केंद्रीय अर्थसंकल्प उद्या लोकसभेत सादर होणार आहे. या कार्यक्रमाचं थेट प्रसारण आकाशवाणी दिल्लीहून सकाळी १० वाजून १० मिनिटांनी सुरू होणार असून दुपारी १ वाजून ५० मिनिटांपर्यंत सुरू राहील.

त्यामुळं आकाशवाणी मुंबईहून दुपारी १ वाजून ३० मिनिटांनी प्रसारित होणारं मराठी राष्ट्रीय बातमीपत्र, उद्या, १ वाजून ५० मिनिटांनी प्रसारित होईल.

**<><><><><>**

संसदेत उद्या सादर होणारा अर्थसंकल्प हा अमृत काळातला महत्वाचा अर्थसंकल्प असेल, असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरू होण्याआधी संसद भवन परिसरात ते बातमीदारांशी बोलत होते.

विरोधक आपलं अपयश झाकण्यासाठी संसदेतला वेळ खर्ची घालत आहेत. अशी टीका मोदी यांनी यावेळी केली.

सर्व राजकीय पक्षांनी आपली पक्षीय धोरणं बाजूला ठेवून पुढच्या साडे चार वर्षांसाठी स्वतःला देशासाठी समर्पित करण्याचं आवाहन मोदी यांनी केलं. राजकीय पक्षांनी २०२९ मध्ये होणाऱ्या लोकसभा निवडणुकीवेळी राजकारण करावं, मात्र

तोपर्यंत शेतकरी, युवक आणि देशाच्या सक्षमीकरणासाठी काम करावं असंही मोदी म्हणाले.

<><><><><>

नीट युजी परीक्षेची प्रश्नपत्रिका फुटण्याचा प्रकार केवळ पाटणा इथं झाल्याचं केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी आज लोकसभेत सांगितलं. नीट परीक्षेतल्या घोटाळ्याची चौकशी सीबीआय मार्फत चालू असून याप्रकरणी न्यायलयात सुनावणी सुरु आहे, असं ते म्हणाले. देशभरात ४ हजार ७०० केंद्रांवर नीट युजी परीक्षा घेण्यात आली. त्यातल्या एका केंद्रावरच अनियमतता झाल्याची नोंद आहे, असं एका पुरवणी प्रश्नाच्या उत्तरात त्यांनी सांगितलं. लोकसभेतले विरोधी पक्ष नेता राहुल गांधी यांनी स्पर्धापरीक्षा यंत्रणेबद्दलचा मुद्दा उपस्थित केला.

भांडवली खर्च आणि गुंतवणुकीसाठी राज्यांना विशेष सहाय्य योजना नव्या आणि विस्तारीत स्वरुपात सुरु ठेवण्याचा निर्णय केंद्र सरकारनं घेतला आहे, असं केंद्रीय अर्थ राज्यमंत्री पंकज चौधरी यांनी आज लोकसभेत सांगितलं. केंद्र सरकारच्या कर्मचाऱ्यांसाठी ८ वा वेतन आयोग स्थापन करण्याचा, तसंच जुनी पेन्शन योजना पुनर्स्थापित करण्याचा कोणताही प्रस्ताव नसल्याचं, त्यांनी सांगितलं.

राज्याला विशेष दर्जा मिळण्यासाठी येणाऱ्या विशिष्ट निकषांच्या श्रेणीत बिहार येत नसल्याचं केंद्र सरकारनं म्हटलं आहे. अर्थ राज्यमंत्री पंकज चौधरी यांनी आज लोकसभेत एका लेखी प्रश्नाला उत्तर देताना  ही माहिती दिली.

प्रधानमंत्री विश्वकर्मा योजनेअंतर्गत आतापर्यंत दोन कोटी २८ लाखांहून अधिक कारागिरांची नावनोंदणी केली असून त्यापैकी १३ लाख ९४ हजारांहून अधिक पात्र लाभार्थ्यांची नोंदणी झाली आहे. यात पाच लाख ४२ हजार २२२ महिला आहेत.

कौशल्य विकास आणि उद्योजकता राज्यमंत्री जयंत चौधरी यांना एका लेखी प्रश्नाला उत्तर देताना ही माहिती दिली.

<><><><><>

अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी राज्यसभेचं कामकाज प्रश्नोत्तराच्या तासानंतर आज दिवसभरासाठी स्थगित झालं. लोकसभेत उद्या अर्थसंकल्प सादर झाल्यावर एक तासानंतर कामकाजाला सुरुवात होईल.

राज्यसभेच्या कामकाजाला प्रश्नोत्तराच्या तासानं सुरुवात झाल्यानंतर अध्यक्ष जगदीप धनखड यांनी हे कामकाज सुरळीत चालवण्यासाठी सदस्यांनी खबरदारी घ्यावी आणि जनतेच्या हितासाठी सर्वांनी एकजुटीनं काम करावं असं आवाहन केलं.

कावड यात्रा मार्गावरच्या दुकानांवरील पाट्या,युपीएससीची बनावट प्रमाणपत्रांच्या मुद्द्यांवरून काँग्रेस, डावे पक्ष, तृणमूल काँग्रेससह विरोधी पक्षाच्या खासदारांनी मांडलेला स्थगन प्रस्ताव अध्यक्षांनी फेटाळून लावला.

<><><><><>

कावड यात्रा मार्गावरच्या, खाद्यगृहांच्या मालकांनी दुकानाच्या पाटीवर स्वतःचं नाव लिहिण्याच्या, उत्तर प्रदेश आणि उत्तराखंड सरकारच्या निर्देशांना सर्वोच्च न्यायालयानं आज स्थगिती दिली.

हे निर्देश धार्मिक भेदभाव करणारे असल्याचं सांगत तृणमूल काँग्रेसच्या खासदार महुआ मोईत्रा, आणि इतर संस्था तसंच व्यक्तींनी या निर्देशांविरुद्ध याचिका दाखल केल्या होत्या. अशा प्रकारचे निर्देश देण्याच्या अधिकाराबाबतही याचिकाकर्त्यांनी प्रश्नचिन्ह उपस्थित केलं होतं. त्यावर न्यायमूर्ती हृषीकेश रॉय आणि न्यायमूर्ती एस व्ही एन भट्टी यांच्या पीठानं आज सुनावणी घेत हंगामी आदेश दिला.

दोन्ही राज्य सरकारांनी येत्या शुक्रवारपर्यंत यावर आपलं म्हणणं सादर करावं, असे निर्देश न्यायालयानं दिले. या प्रकरणाची पुढची सुनावणी शुक्रवारी होणार आहे.

**<><><><><>**

महाराष्ट्रात आज बऱ्याच ठिकाणी मुसळधार पावसामुळे जनजीवन विस्कळीत झालं. अनेक ठिकाणी सखल भागात पाणी साचलं, तर ठिकठिकाणी नदी नाल्यांचे प्रवाह फुगले आहेत.

राज्यातल्या १७ जिल्ह्यांमध्ये आतापर्यंत सरासरीएवढा पाऊस पडला आहे. सोलापूर आणि धाराशिव जिल्ह्यांमध्ये यंदा सर्वाधिक पाऊस पडला असून, १२ जिल्ह्यांमध्ये सरासरीपेक्षा जास्त पावसाची नोंद झाली आहे.

हवामान विभागानं **कोकण, दक्षिण महाराष्ट्र आणि विदर्भात** जोरदार पावसाचा इशारा दिला आहे. कुलाबा वेधशाळेनं **रत्नागिरी** आणि **सातारा** या जिल्ह्यांना उद्यासाठी रेड अलर्ट दिला आहे. तर **रायगड, सिंधुदुर्ग, पुणे** आणि **कोल्हापूर** या जिल्ह्यांना ऑरेंज अलर्ट दिला आहे.

**<><><><><>**

शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांना प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यासाठी सहा महिन्यांची मुदत देण्याचा निर्णय मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी घेतला आहे. यामुळे आता अर्ज केल्याच्या दिनांकापासून सहा महिन्यांपर्यंत हे विद्यार्थी जात वैधता प्रमाणपत्रं सादर करू शकतील. विशेषतः मराठा समाजाच्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रं मिळण्यात येणाऱ्या अडचणी या निर्णयामुळे दूर होणार आहेत.

**<><><><><>**

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार यांनी आज सह्याद्री अतिथीगृहात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेतली. या भेटीत जलसंपदा, दुधाचे दर आणि साखर कारखान्यांचे काही प्रलंबित प्रश्न यासहित अनेक विषयांवर त्यांच्यात सखोल चर्चा झाल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

**<><><><><>**

भारतीय क्रिकेट संघ -श्रीलंका दौऱ्यासाठी श्रीलंकेत आज पोचला आहे. या दौऱ्यात पल्लेकेले इथं २७, २८ आणि ३० जुलै रोजी  टी ट्वेंटी मालिकेतले तीन सामने होणार आहेत.  तर कोलंबो इथं २, ४, आणि ७ ऑगस्ट रोजी  एकदिवसीय मालिकेतले तीन सामने खेळले जाणार आहेत.

**<><><><><>**

नेपाळी कॅलेंडर    विक्रम संवतनुसार आजपासून श्रावण संक्रातीला प्रारंभ झाला. आज श्रावणातला पहिला सोमवार असल्यानं काठमांडूच्या पशुपतीनाथ मंदिरात लाखो शिवभक्तांची दर्शनासाठी मोठी गर्दी झाली होती. दर्शनासाठी आलेल्या भाविकांनी नदीत स्नान केलं. त्यानंतर नदीतील पवित्र पाणी कलशातून मंदिरात आणून शिवलिंगावर अभिषेक केला. मान्सूनच्या आगमानाचं प्रतिक म्हणून महिलांनी हिरव्या रंगाचे कपडे परिधान केले होते.

**//<><><><><>//**